पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक २९/०६/२०१९

## गडचिरोली पोलीस विभागातर्फे वीर बाबुराव शेडमाके भव्य कृषी मेळाव्याचे आयोजन

गडचिरोली जिल्हयातील 76 टक्के भुभाग हा जंगलाने व्याप्त असुन येथील जनता ही डोंगराळ भागात तसेच घनदाट अरण्यात राहत असल्याने अशिक्षीत, मागासलेली राहुन विकासापासुन कोसो दुर आहे. उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने कुठेतरी सपाट प्रदेश पाहुन जंगल तोडुन हे गावकरी शेती करीत असल्याचे दिसुन येते. आधुनिक पद्धतीचा यांचे दिनक्रमात अभाव असुन पारंपारीक पद्धतीनेच शेती करीत असल्याने यांना बऱ्याच अडचणींचा सामना करावा लागत आहे. जिल्हयातील बहुतांश परीसरात खरीप हंगामा दरम्यान जास्तीत जास्त धान पिकाची लागवड करण्यात येत असुन धान पेरणी ते धान मळणी दरम्यान होणाऱ्या प्रक्रीयेत सुसुत्रता यावी व शेतकऱ्यांना भरघोस उपत्न घेता यावे. त्याचप्रमाणे शेतीबरोबरच जोडधंदा म्हणुन दुग्धव्यवसाय, मत्सव्यवसाय करता यावा या उदात्त हेतुन गडचिरोली पोलीस प्रशासनाचे वतीने जिल्हयातील अतिदुर्गम अशा भामरागड व एटापल्ली तालुक्यातील आदिवासी शेतकरी बांधवा करीता **वीर बाबुराव शेडमाके भव्य कृषी मेळाव्याचे** आयोजन करुन त्यांना लाभ व्हावा म्हणुन दि. 28.06.2019 रोजी पोलीस मुख्यालय, गडचिरोली परीसरात पोलीस अधिक्षक श्री. शैलेश बलकवडे, अपर पोलीस अधिक्षक श्री. महेंद्र पंडीत, अपर पोलीस अधिक्षक (नक्षल) श्री. मोहीत कुमार गर्ग यांचे संकल्पनेतुन **वीर बाबुराव शेडमाके भव्य कृषी मेळाव्याचे** आयोजन करण्यात आले होते. तसेच जुन महिन्यामध्ये पोस्टे, उपपोस्टे, पोमके स्तरावर 55 कृषी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

सदर मेळाव्यात श्रीमती प्रिती हिरळकर, उपविभागीय कृषी अधिकारी गडचिरोली, श्री. जे.डी. कौटकर तालुका कृषी अधिकारी भामरागड, श्री. संजय जी. मेश्राम तालुका कृषी अधिकारी एटापल्ली, श्री. एस.जे. घनवट तालुका कृषी अधिकारी अहेरी, श्री. अनिलकुमार श्रीवास्तव बँक व्यवस्थापक बँक ऑफ इंडीया गडचिरोली, श्री. प्रशांत वैदय सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय गडचिरोली, श्री. सचिन गं. यादव जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी गडचिरोली, श्री. सुनिलकुमार पठारे प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा गडचिरोली, श्री. सुधाकर गौरकार सहा. प्रकल्प अधिकारी (विकास) एकात्मीक आदीवासी विकास प्रकल्प गडचिरोली, श्री. हेमंतकुमार उंदीरवाडे ब्लॉक टेक्नॉलॉजी मॅनेजर चामोर्शी या तज्ञांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

मेळाव्यात उपस्थित वक्त्यांनी परंपरागत शेती न करता अत्याधुनिक पद्धतीने शेती कशी करायची, लागवडीच्या पद्धती, कृषी विभागाच्या योजना, दुग्ध व्यवसाय करण्याबाबत मार्गदर्शन, मत्स्य व्यवसाय करण्याबाबत मार्गदर्शन व विभागाच्या विविध योजना, आदीवासी विकास विभागाच्या विविध योजनांची माहीती, कृषी कर्ज व पिक विमा योजनांची माहीती इ. विषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाअंती उपस्थित शेतकऱ्यांना बि-बियाणांचे विनामुल्य वाटप करण्यात आले. पोलीस प्रशासनाद्वारे आयोजीत कृषी मेळाव्याचे माध्यमातुन बऱ्याच गोष्टी शिकायला मिळाल्यात असा अभिप्राय शेतकऱ्यांनी व्यक्त करुन पोलीस विभागाचे आभार मानले.


भव्य कृषी मेळावा




भव्य कृषी